# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक-
०२०- २५६२११८१
Email :- dyrelg@unipune.ac.in

शैक्षणिक पात्रता विभाग
गणेशखिंड पुणे - ०७

संदर्भ क्र. शै.पा./ 172

दिनांक - 27/10/2020

प्रति,
मा. प्राचार्य/ संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये/ संस्था
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
पुणे - ४११००७.

***विषय :- विद्यार्थ्यांच्या चुकलेल्या नावांत दुरूस्ती करणे, प्रवेश रद्द करणे आणि पात्रता क्रमांक स्थलांतर करण्यासंदर्भातील कार्यपध्दतीबाबत...***
***संदर्भ :-शैक्षणिक पात्रता विभागाचे पत्र क्र.शै.पा./९०, दिनांक ३१/०५/२०१७***

महोदय/महोदया,

वरील विषय व संदर्भिय पत्रास अनुसरून आपणांस कळविण्यात येते की, शैक्षणिक पात्रता यादीत विद्यार्थ्यांच्या चुकलेल्या नावांत दुरूस्ती करणे, प्रवेश रद्द करणे आणि पात्रता क्रमांक स्थलांतर करण्यासंदर्भातील कार्यपध्दती खालीलप्रमाणे :-

**१. शैक्षणिक पात्रता यादीत विद्यार्थ्यांच्या चुकलेल्या नावात दुरूस्ती करणेबाबत :-**

महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांची शैक्षणिक पात्रता करताना विद्यार्थ्यांच्या नावात जर चुकीची नोंद झाली असेल तर ती दुरूस्त करण्यासाठी महाविद्यालयांनी मा. प्राचार्य/संचालक यांच्या सहीचे पत्र (नमुना वरील संदर्भिय पत्रानुसार) स्कॅन करून पात्रतेच्या लॉग इन आयडी मधून अपलोड करावे व Student Details भरून Student Name correction request सोबत ऑनलाईन पाठवावे.

(Main Menu - Eligibility - Send Request - Student Name Correction)

**२. विद्यार्थ्याचा प्रवेश रद्द करणेबाबत :-**

एखाद्या विद्यार्थ्याने कॉलेज/ संस्थेत प्रवेश घेतल्यानंतर त्याची शैक्षणिक पात्रता झाली असेल व त्याला पात्रता क्रमांक मिळाला असेल अशा विद्यार्थ्याचा प्रवेश त्या विद्यार्थ्याने काही कारणास्तव रद्द करण्याची विनंती केली असेल अशा केसेस देखील ऑनलाईन Request मधूनच पाठविण्यात याव्यात. सोबत

मा.प्राचार्य/संचालक यांच्या सहीचे पत्र व विद्यार्थ्याने दिलेला अर्ज स्कॅन करून पात्रतेच्या लॉग इन आयडी मधून अपलोड करावे व व Student Details भरून Student Cancel Admission Request सोबत ऑनलाईन पाठवावे.

(Main Menu - Eligibility - Send Request - Student Cancel Admission)

**३. विद्यार्थ्याचा पात्रता क्रमांक स्थलांतर करणेबाबत...**

एखाद्या विद्यार्थ्याने पुणे विद्यापीठाअंतर्गत प्रथम वर्ष दुस-या कॉलेज/ संस्थेत प्रवेश घेऊन नंतर दुस-या किंवा पुढच्या वर्षासाठी पुणे विद्यापीठाअंतर्गतच त्याची कॉलेज किंवा संस्था बदल असल्यास अशा विद्यार्थ्याचा पात्रता क्रमांक स्थलांतरीत करून घेणेबाबत मा. प्राचार्य/ संचालक यांच्या सहीचे पत्र (नमुना सोबत जोडला आहे.) स्कॅन करून पात्रतेच्या लॉग इन आयडी मधून अपलोड करावे व Student Details भरून Student Transfer Request सोबत ऑनलाईन पाठवावे.

(Main Menu - Eligibility - Send Request - Student Transfer Request)

आपणास विनंती की, शैक्षणिक पात्रता विभागात पात्रतेच्या यादीत विद्यार्थ्यांच्या नावात दुरूस्ती करणेबाबत, विद्यार्थ्याचा प्रवेश रद्द करणेबाबत तसेच विद्यार्थ्याचा पात्रता क्रमांक स्थलांतर करणेबाबतचे अर्ज/पत्र हे हार्ड कॉपी न पाठवता **सॉफ्ट कॉपी ने पात्रतेच्या लॉग इन आयडी मधूनच Request ऑनलाईन पाठवावी,** याची कृपया नोंद घेण्यात यावी.

कळावे,

आपला,

सहायक कुलसचिव
(शैक्षणिक पात्रता विभाग)

**पत्राचा नमुना** :-

आमच्या महाविद्यालयात ------------------- या विद्यार्थ्याने/विद्यार्थिनीने ------------ या वर्गात प्रथम/द्वितीय/तृतीय वर्षासाठी शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ मध्ये प्रवेश घेतलेला असून पूर्वीच्या महाविद्यालयात प्रथम वर्षासाठी तिला/त्याला विद्यापीठ पात्रता क्रमांक १२०१९००८२८७ मिळालेला होता. सदर क्रमांक हा आमच्या महाविद्यालयाच्या PUN ०११०५० क्रमांकावर वर्ग करावा, हि नम्र विनंती.

| अ.क्र. | विद्यार्थ्याचे नाव | प्रवेश घेतलेल्या कोर्सचे नाव व वर्ष | पात्रता क्रमांक | जुन्या महाविद्यालयाचे नाव व PUN CODE | नवीन महाविद्यालयाचे नाव व PUN CODE |
|---|---|---|---|---|---|
| १ | ----------------- | प्रथम/द्वितीय/तृतीय वर्ष | १२०१९००८२८७ | -- | -- |

कळावे,

आपला,

(--------------------)